राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबईसाठी मानव संसाधन व्यवस्थापन HRMS- सॉफ्टवेअरची खरेदी नॅशनल इन्फोमॅटिक्स सेंटर सर्विसेस इंकोर्पोटेड (NICSI) यांच्याकडून करण्यास प्रशासकीय मान्यता मिळण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः प्रशामा-०२१९/प्र.क्र.१४३/आरोग्य-७

१० वा मजला, गोकुळदास तेजपाल रूग्णालय संकूल इमारत,
नवीन मंत्रालय, मुंबई - ४०० ००१.
दिनांक : ०६ ऑगस्ट, २०१९.

वाचा :-

१) आयुक्त (आरोग्य सेवा) तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांचे पत्र क्र.एनएचएम/आयटी/एचआरएमएस/१०४१४१/१८१९, दिनांक १४ फेब्रुवारी, २०१९, दिनांक ०२ मार्च, २०१९, २० मे, २०१९ व २३ जुलै, २०१९.

२) केंद्र शासनाचे परिपत्रक No.G-३००१२/२०१४/IFS, दिनांक १८ जून, २०१८.

३) नॅशनल इंफोर्मेटिक्स सेंटर सर्विसेज इंक. यांचे पत्र दिनांक ०६ जून, २०१९.

प्रस्तावना :-

राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबईसाठी मानव संसाधन व्यवस्थापन सॉफ्टवेअरची (HRMS) खरेदी नॅशनल इन्फोर्मेटिक्स सेंटर सर्विसेस इंकार्पोरेटेड (NICSI) यांच्यामार्फत करण्यास प्रशासकीय मान्यता मिळण्याबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

केंद्र शासनाच्या मंजुर वार्षिक प्रकल्प आराखडयात राज्यातील नियमित कर्मचारी व कंत्राटी कर्मचारी यांच्यासाठी एकाच प्रकारचे एचआरएमएस सॉफ्टवेअर असावे अशी अट आहे. सद्यस्थितीत एनएचएम, मुंबईकडे अशाप्रकारची सुविधा नसल्याने सन २०१८-१९ मध्ये केंद्राकडून पीआयपी अंतर्गत निधी प्राप्त होतांना कपात (Penalty) करण्यात आलेली होती. सदरची बाब विचारात घेता केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनूसार राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबईसाठी HRMS Software नॅशनल इन्फोर्मेटिक्स सेंटर सर्विसेस इंकार्पोरेटेड (NICSI) यांचेमार्फत

त्यांच्याकडील अधिसूचित संस्थेमार्फत (Empanelled Agencies) एनएचएमच्या आवश्यकता व गरजेनूसार Customized करुन घेण्यासाठी रु.६०.९२ लक्ष (अंदाजित) इतक्या रकमेच्या खर्चास प्रशासकीय मान्यता मिळण्याबाबत आयुक्त (आरोग्य सेवा) तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांनी शासनाकडे प्रस्ताव सादर केलेला आहे. त्यानूसार खालील विवरणपत्रात पुढील अटींच्या अधिन राहून सदर प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. :-

विवरणपत्र

Sr. No	Name of Head	Approved Budget in PIP (In Lakhs)	Proposal for Procurement (In Lakhs)
1	HRMS Software Development and Implementation PIP 2017-18 Committed in PIP 2018-19 Now Committed in New FMR Code 17.7 for year 2019-20	95.00	Procurement of HRMS Software from NICSI Empanelled Agencies with proper customization as per requirement of NHM Amt. in Approx. Rs.60.92 Lakh

अटी :-

१) सदर HRMS Software केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनूसार NICSI मार्फत त्यांचेकडील अधिसूचित एजेन्सीज (Empanelled Agencies) कडून एनएचएमच्या आवश्यकता व गरजेनूसार Customized करुन घेण्यात यावे.

२) सदर HRMS Software चे पुरवठा कार्यादेश (Work Order) व मोबदला (Payment) NICSI यांना देण्यात यावेत.

३) सदर HRMS Software खरेदीबाबतची आवश्यकता / मागणी याची शहानिशा / खातरजमा करण्यात यावी. तसेच या बाबीची खरेदी माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या (DIT) मार्गदर्शक सूचनांनूसार करण्यात यावी.

४) सदरहू NICSI संस्थेकडून HRMS Software खरेदीबाबतचे विनिर्देश गरजेनुसार व अद्ययावत असल्याची खातरजमा करण्यात यावी. खरेदी करावयाच्या बाबींचे तांत्रिक विनिर्देश (Technical specification) संबंधित तज्ञांनी (तांत्रिक समिती / अधिकारी) यांनी मान्य केलेल्या विनिर्देशानुसार असावेत. तसेच, सदर तांत्रिक विनिर्देश (Technical specification) हे कोणत्याही विशिष्ट कंपनीला फायदा होईल अशा रितीने तयार केलेले नसल्याबाबत खातरजमा करण्यात यावी. त्यानंतरच याबाबींची खरेदी करण्यात यावी.

५) शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्र. भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/ उद्योग-४, दिनांक १ डिसेंबर, २०१६ अन्वये प्रसिध्द करण्यात आलेल्या शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपध्दतीची सुधारीत नियमपुस्तिका यामधील तरतूदी तसेच केंद्र शासनाचे, मिनिस्ट्री ऑफ कम्युनिकेशन अँड इन्फॉर्मेशन टेक्नॉलजी, डिपार्टमेंट ऑफ इलेक्ट्रॉनिक्स अँड इन्फॉर्मेशन टेक्नॉलजी, नॅशनल इन्फोर्मेटिक्स सेंटर यांचे सर्क्युलर क्र.G-३००१२/०२/२०१४/IFS दिनांक १८/०६/२०१४ अन्वये प्रसिध्द करण्यात आलेल्या शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपध्दतीच्या तरतुदीनूसार विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन प्रस्तावित कार्यवाही करण्यात यावी.

६) खरेदी करण्यात येणाऱ्या बाबींची पुरवठापूर्व / पुरवठानंतर नमुना तपासणी (pre/Post dispatch random sample inspection) करुन उचित व योग्य विनिर्देश (specification) असलेल्या वस्तुंचीच खरेदी करण्यात येईल, याची संचालनालयातील माहिती व तंत्रज्ञान विभागामार्फत खात्री करण्यात यावी.

७) तसेच सदर बाबींचा विहीत मुदतीत वापर होईल, याची दक्षता घेण्यात यावी.

८) सदरहू HRMS Software खरेदीसाठी होणारा खर्च राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत केंद्र शासनाने मंजुर केलेल्या सन २०१९-२० या आर्थिक वर्षात FMR Code १७.७ अंतर्गत कमिटेड रक्कम रु.९५.०० लक्ष अनुदानातून भागविण्यात यावा. सदरची खरेदी प्रशासकीय मंजुरीच्या विहित कालावधीत पूर्ण होईल याची दक्षता घ्यावी.

९) तसेच, या बाबींच्या खरेदी द्विरुक्ती (Duplication) होणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी. याबाबतची संपूर्ण जबाबदारी कार्यक्रम प्रमुखांची राहील.

१०) संपूर्ण खरेदी प्रक्रिया राबविताना केंद्रिय दक्षता आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांचे (CVC Guidelines) तंतोतंत पालन करण्यात यावे.

११) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/भाग-२/२०१३/विनियम, दिनांक १७ एप्रिल, २०१५ सोबतच्या परिशिष्टातील वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८, भाग-पहिला उपविभाग-दोन मधील अ.क्र.४ नियम क्र.७ समोरील स्तंभ क्र.६ येथील अटींची पूर्तता करण्यात यावी.

उपरोक्त अनुक्रमांक १ ते ११ येथे नमूद अटींची पूर्तता करण्याची व खरेदी नियमानुसार व आवश्यकते प्रमाणे आहे हे सुनिश्चित करण्याची संपूर्ण जबाबदारी आयुक्त, आरोग्य सेवा व अभियान

संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, संचालक, आरोग्य सेवा संचालनालय व कार्यक्रम प्रमुख यांची राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक 201907161147198617 असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Jamsher Samsher Tadavi

Digitally signed by Jamsher Samsher Tadavi
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Public Health Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=cc70f5be589b29aaa447f5cdd15c9826781de5daa02a4ecf339fb1d0559ab9d6, serialNumber=a92e218ede7b7c9acaa3bea18f6d46feab420783e12f260504f402b54de8c476, cn=Jamsher Samsher Tadavi
Date: 2019.08.06 11:26:40 +05'30'

(ज. स. तडवी)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:-

१) आयुक्त (आरोग्य सेवा) तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.
२) संचालक, आरोग्य सेवा, मुंबई.
३) अतिरिक्त संचालक, राज्य कुटुंब कल्याण कार्यालय, पुणे.
४) सहसंचालक (असंसर्गजन्य रोग), आरोग्य सेवा, मुंबई.
५)सर्व सह संचालक (आरोग्य सेवा संचालनालया मार्फत)
६) सर्व सहसचिव/उपसचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग.
७) उप संचालक, सर्व मंडळ कार्यालये.
८) सर्व जिल्हा शल्य चिकित्सक (FWB मार्फत)
९) सर्व जिल्हा आरोग्य अधिकारी (FWB मार्फत)
१०) निवडनस्ती (आरोग्य-७)